किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● अस्थैर्य

५● निर्वासित स्थलांतरितांच्या विश्वात

११● 'चॅनेल्स'... सर्वसमावेशक विकासाची

१५● प्रतीक्षा राबणा-या हातांची...

२३● वार्षिक आढावा



खंड १५ : अंक ४ जुलै २०१६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


वार्षिक वर्गणी २००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.


वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १५ (अंक ४) जुलै २०१६**
**संपादक - अभय टिळक**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# अस्थैर्य

निम्म्याने सरत आलेल्या या २०१६ वर्षात उभे जग पुन्हा एकवार अस्थैर्याच्या पर्वात ढकलले गेले आहे. युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याच्या ब्रिटनच्या निर्णयामुळे जागतिक समुदायाच्या पुढ्यातील अनिश्चितता अधिकच गहिरी बनलेली आहे. २००८ साली उद्‌भवलेल्या मंदीच्या चटक्यांनी वैश्विक अर्थव्यवस्था गेली नऊवर्षे पोळते आहेच. आता, युरोपीय समुदायाच्या एकत्रित अर्थव्यवस्थेचे भवितव्य काय राहील, या आशंकेची काजळी जागतिक अर्थकारणावर नव्याने चढण्याची दाट शक्यता क्षितिजावर जमू पाहते आहे. आता, युरोपीय समुदायातून फुटून बाहेर निघण्याचा जो कौल ब्रिटिश नागरिकांनी मतपेटीद्वारे व्यक्त केला त्या निर्णयाबाबतही फेरमतदान घेतले जाण्याची मागणी तिथे उठवली जाते आहे. जागतिक अर्थव्यवस्थेची पुन्हा एकवार नव्याने फेरमांडणी घडण्याची प्रक्रिया या सगळ्यांद्वारे उचल घेईल, अशी ही सारी लक्षणे दिसतात. त्यांतच, युरोपीय समुदायातील अनेक देश सध्या स्थलांतरितांच्या प्रश्नांशी दोन हात करण्यात गुंतलेले आहेत. स्थलांतरितांच्या लोंढ्यांपायी देशोदेशी निर्माण होत असलेल्या काही प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केलेला सापडेल. मुळात, एकूणच युरोपीय समुदायात नवीन रोजगारनिर्मितीचा सरासरी वेग २००८ सालानंतर प्रचंड मंदावलेला आहे. त्यांमुळे विशेषतः तेथील तरु णाई सध्या कमालीची अस्वस्थ आणि सैरभैर आहे. ब्रिटनच्या या पवित्र्यापायी युरोपीय समुदायाच्या भवितव्याबाबत नव्याने उद्‌भवलेल्या अनिश्चिततेमुळे तरु णाईच्या विमनस्कतेमध्ये भरच पडेल. अशा सगळ्या वातावरणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाची वाट नव्याने अधिकच काटेरी न बनली तरच नवल. बाकी देशांचे एक वेळ बाजूला ठेवले तरी, या घडामोडींना चीन इथून पुढच्या काळात कशा प्रकारे सामोरा जातो ते बघणे सगळ्यांच्याच लेखी उत्कंठेचे ठरेल. कारण, मंदीच्या वावटळीने आजही गांजलेल्या अमेरिकी अर्थव्यवस्थेचा खालावलेला रागरंग बघून युरोपीय समुदायाच्या समाईक बाजारपेठेवर चीनने त्याच्या व्यापारी अपेक्षा आजवर एकवटलेल्या होत्या. ***(कृपया पृष्ठ क्रमांक २४ पाहावे)***



# वाचकांचा प्रतिसाद

'उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक' या शब्दत्रयीत आपली आटोपशीर जाहिरात करणारी 'अर्थबोधपत्रिका' ती जाहिरात लवमात्रही खोटी नसल्याची प्रचीती आपल्या बहुविध विषय हाताळणा-या लेखांमधून देते. माहितीसाठा अनंत असताना; निवडक, अचूक आणि उपयुक्त माहिती लेखांमधून सादर करणे ही जिकिरीचीच बाब असते. परंतु, सर्व महनीय संपादकमंडळाकडून लेखांचे असे लेखन नेहमीच सहजसुलभतेने होत असल्याचे 'अर्थबोधपत्रिके'तील लेख वाचत असताना प्रकर्षाने जाणवते. वाचनाचा अवर्णनीय आनंद आणि जोडीला माहितीसमृद्धता अशी ठळक ओळख बनवलेल्या 'अर्थबोधपत्रिके'चा जून २०१६ या महिन्याचा अंकदेखील त्या अनुभूतीस अपवाद नाही. ***(कृपया पृष्ठ क्रमांक २३ पाहावे)***

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# निर्वासित स्थलांतरितांच्या विश्वात

सीरिया आणि त्याच्या परिसरातील अशांततेमुळे तिथून परागंदा झालेल्या निर्वासितांच्या लोंढ्यांपायी उभा युरोप गेल्या वर्षीपासून जणू आवर्तात सापडलेला आहे. आपापल्या मायदेशात राहणे असुरक्षित बनल्यामुळे अथवा आपले जीवित व मालमत्ता यांना मायदेशात धोका निर्माण झाल्यामुळे निरुपाय होऊन स्थलांतर करणा-या निर्वासितांना आपल्या देशाच्या सीमा खुल्या करणे अथवा न करणे, निर्वासित स्थलांतरितांना आपल्या हद्दींमध्ये प्रवेश देणे अथवा न देणे, स्थलांतरितांना सामावून घेणे अथवा न घेणे यासंदर्भातील कायदेकानू दुस-या महायुद्धानंतर युरोपातील अनेक देशांनी अतिशय आखीवरेखीवपणे तयार करून आजवर त्यांची दरोबस्त अंमलबजावणी केली. मात्र, सीरियातील पेचामुळे ज्या संख्येने निर्वासित स्थलांतरितांचे जथ्थे युरोपीय देशांच्या सीमांवर येऊन आदळले त्या प्रपातात ते सारे नियम, संकेत, कायदेकानू जणू पार गटांगळ्या खाऊन वाहत गेले. भाषा, संस्कृती, परंपरा, कौशल्ये, शिक्षण अशा सगळ्यांच बाबतींत एतद्देशीयांपेक्षा निराळ्या असणा-या निर्वासितांच्या अनाहूत व अनपेक्षित आगमनामुळे युरोपातील अनेक देशांमधील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक आणि वांशिक संतुलन अलीकडे चांगलेच दोलायमान बनलेले आहे.

मोठ्या संख्येने आपल्या भूप्रदेशात प्रवेशलेल्या स्थलांतरितांना सामावून कसे घ्यावयाचे, ही युरोपातील आजच्या राजकीय नेतृत्त्वाच्या पुढ्यातील सर्वांत जटिल समस्या ठरते आहे. निर्वासित स्थलांतरितांची भाषा स्थानिकांच्या भाषेपेक्षा निराळी असावी, हे ओघानेच येते. परंतु, प्रश्न केवळ भाषिक भिन्नतेचा नाही. स्थलांतरितांची शैक्षणिक पात्रता व कौशल्यांचा दर्जाही सरमिसळ होण्यात मोठा अडथळा शाबीत होतो आहे. भाषावैचित्र्य आणि उचित व्यावसायिक कौशल्यांचा अभाव या दोहोंपायी निर्वासितांचा देशोदेशींच्या श्रमांच्या बाजारपेठेतील प्रवेश दुष्कर ठरतो आहे. त्यांहीपेक्षा नाजूक ठरणारा सवाल आहे तो, स्थलांतरित स्थानिक जनसमूहांशी सात्म कसे व कधी पावणार, हा !



भवतालातील घडामोडींपासून फार काळ फटकून राहता येणार नाही, असा जणू इशाराच सीरिया व परिसरातील भूप्रदेशामधून युरोपात शिरकाव केलेल्या निर्वासितांच्या प्रश्नाने युरोपीय देशांना दिलेला आहे. सीरियात जीवित व वित्त असुरक्षित बनल्यामुळे तिथून काढता पाय घेतलेले अगणित नागरिक निर्वासित बनून आजवर टर्की, लेबनन आणि जॉर्डन या देशांच्या सीमा भेदून तिथे प्रवेशले व रहिवासी बनले. सीरियातील यादवीपोटी जवळपास ७० लाख तर सीरियाच्या सीमांबाहेरील भूप्रदेशातील युद्धमान अशांततेपायी सुमारे ६० लाख असे एकंदर १ कोटी ३० लाख नागरिक आजवर निर्वासित झाल्याचे सांगण्यात येते. यांपैकी जवळपास एक कोटी निर्वासित युरोपच्या आश्रयास गेले. परंतु, त्याच वेळी, लेबनन वा जॉर्डन यांसारख्या देशांवर निर्वासितांच्या तेथे जाण्याने जो भार पडलेला आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. जेमतेम ४५ लाख देशवासी असणा-या लेबननमध्ये सीरियातून पळ काढलेले जवळपास १५ लाख निर्वासित आजमितीस स्थिरावलेले आहेत. त्यांतील केवळ १० लाख निर्वासित काय ते नोंदणीकृत आहेत. नागरिकांच्या कल्याणासाठी जॉर्डनमधील शासनसंस्था करत असलेल्या एकंदर खर्चापैकी जवळपास एक चतुर्थांश खर्च, सीरियातून जॉर्डनमध्ये प्रवेशलेल्या निर्वासितांच्या खुशालीपोटीच व्यय होतो आहे.

सीरियातील अशांततेपायी युरोपीय देशांच्या वेशीवर थडकलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यांपायी, स्थलांतरितांचा आणि त्यांतही निर्वासित स्थलांतरितांचा प्रश्न पुन्हा एकवार जागतिक समुदायाच्या विचारविश्वात दाणदिशी ऐरणीवर आलेला आहे. निर्वासित स्थलांतरितांच्या प्रश्नाला जगाला प्रथम सामोरे जावे लागले ते दुस-या महायुद्धानंतर. निर्वासित स्थलांतरित कोणाला म्हणावयाचे इथपासून मग चर्चेला सुरुवात झाली ती त्या वेळी. ‘छळाच्या भीतीचे सावट मायदेशात माथ्यावर सतत राहिल्याने जो तिथून परागंदा होतो तो निर्वासित’, अशी व्याख्या, संयुक्त राष्ट्रसंघाची जी संस्था निर्वासितांच्या प्रश्नाची हाताळणी करण्यासाठी तेव्हा निर्माण करण्यात आली तिने तत्कालीन परिस्थितीमध्ये सिद्ध केली. निर्वासितांसंदर्भात १९५१ साली करण्यात आलेल्या वैश्विक करारात ती व्याख्या नमूद करण्यात आलेली होती.

निर्वासितांच्या प्रश्नासंबंधी १९५०च्या दशकापूर्वीपासून आजवर काम करत आलेल्या 'युनायटेड नेशन्स हाय कमिशनर फॉर रेफ्युजीज्' या संघटनेच्या अंदाजानुसार आजघडीला जगभरातील निर्वासितांची संख्या भरते जवळपास सहा कोटींच्या घरात. त्यांपैकी एक तृतीयांश, म्हणजे, सुमारे दोन कोटी निर्वासित हे त्यांच्या त्यांच्या मायदेशाच्या सीमांबाहेरच अधांतरी, त्रिशंकूसारखे लोंबकळत, तिष्ठत वास करत आहेत. आजघडीला, निर्वासितांच्या संदर्भातील सर्वांत कळीचा मुद्दा ठरतो आहे तो आपापल्या मायभूमीतून पलायन केलेल्या परंतु, 'ना घरका ना घाटका' अशा अवस्थेत पाच वर्षांपेक्षा अधिक काळपासून तरंगत राहिलेल्या निर्वासितांच्या भविष्याबाबतचा. 'युनायटेड नेशन्स हाय कमिशनर फॉर रेफ्युजीज्' या संघटनेच्या अदमासानुसार, जगातील आजमितीच्या एकंदर निर्वासितांपैकी थोडेथोडके नव्हे तर तब्बल ४५ टक्के निर्वासित पाच वर्षे वा त्यांपेक्षा अधिक काळ परक्या भूमीत आश्रय करून राहिलेले आहेत.

मायदेशातील अशांततेपायी जीविताला धोका निर्माण झाल्याने तिथून पळ काढलेल्या निर्वासितांच्या प्रश्नांबाबत जागतिक स्तरावर विचारविनिमय सुरू झाला त्याला पार्श्वभूमी होती ती दुसऱ्या महायुद्धातील निर्वासितांची. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने, मग, निर्वासितांच्या प्रश्नांबाबत १९५१ साली एक व्यापक असा वैश्विक करार अस्तित्त्वात आला. पुढे, त्याच करारासंदर्भातील एक नियमावली १९६७ साली व्यवहारात आणली गेली. कोणत्याही कारणाने निर्वासिताचे जिणे भाळी आलेल्या जनसमुदायांना कोणत्या प्रकारची वागणूक दिली जावी, त्यांचे संरक्षण कशा प्रकारे करण्यात यावे, या संदर्भात आज व्यवहारात रूढ असलेली मार्गदर्शक तत्त्वे याच दोन दस्तऐवजांनी निश्चित केलेली आहेत. जिवाला भय अथवा धोका निर्माण झाल्याच्या भावनेने जे कोणी नागरिक निर्वासित बनून ज्या कोणत्या देशातून आपल्या भौगोलिक हद्दीमध्ये आश्रयाला येतील त्यांची त्यांच्या मायदेशी पुन्हा (त्यांच्या इच्छेविरुद्ध) पाठवणी केली जाणार नाही, अशा आशयाची हमीवजा बांधिलकी, १९५१ साली तयार करण्यात आलेल्या करारावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या राष्ट्रांना द्यावी लागते. हेच बंधन आजही व्यवहारात लागू आहे.



आता, निर्वासितांसंदर्भातील वैश्विक करार होऊन अर्धशतकापेक्षाही अधिक काळ उलटून गेलेला आहे. काळाच्या ओघात 'निर्वासित' या संज्ञेच्या अर्थांतही बदल झाले. देशोदेशी १९५० तसेच १९६०च्या दशकात उद्भवलेल्या अशांतीच्या प्रसंग व घटनांनुसार 'निर्वासित' या शब्दाला अर्थांतराचे निरनिराळे पापुद्रे चढत राहिले. विस्मयाची बाब म्हणजे, १९४७ साली झालेल्या भारताच्या फाळणीदरम्यान जे लक्षावधी नागरिक विस्थापित बनले त्यांना मात्र 'निर्वासित' असे संबोधले गेले नाही ! 'निर्वासित' या संकल्पनेच्या व्याख्येला जसजसे अनंत पदर व अंतःपदर जोडले जाऊ लागले त्याच्याच जोडीने निर्वासितांसंदर्भातील नियम, संकेत, मार्गदर्शक तत्त्वे, कायदेकानू यांतही राष्ट्राराष्ट्रांनी स्थानिक परिस्थितीनुसार वेळोवेळी बदल केले. निर्वासितांना साहाय्य करणाऱ्या संस्था आणि नियमावलींचे एक भलेमोठे जाळेच या सगळ्या सव्यापसव्याद्वारे आजघडीला जगात निर्माण झालेले आहे. त्यांमुळे, निर्वासितांना द्यावयाची वागणूक, त्यांचा दर्जा, निर्वासितांचे पुनर्वसन अशा विविध बाबतींत पूर्वीच्या तुलनेत आज प्रचंड गुंतागुंत तयार झालेली दिसते.

परागंदा होऊन दिशाहीन अवस्थेत काळ कंठणाऱ्या निर्वासितांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या आज तीन संभाव्य दिशा प्रस्थापित आहेत. ज्या देशातून स्थलांतरित नागरिक निर्वासित म्हणून बाहेर पडलेले आहेत त्याच देशात (म्हणजेच, स्थलांतरित निर्वासितांच्या मायदेशात) त्यांची पुन्हा पाठवणी करणे (अर्थातच, त्यांच्या मर्जीनुसार) हा झाला त्या तीनमधील पहिला पर्याय. 'निर्वासित' म्हणून मायभूमीपासून दूर कोठेतरी जगण्याचे दुर्भाग्य भाळी आलेल्या बहुसंख्य नागरिकांची साहजिकच पसंती या पहिल्या पर्यायाला असते. परंतु, हा पर्याय व्यवहारात अवलंबणे अजिबातच सोपे नाही. कारण, ज्या कारणांपायी नागरिकांना आपल्या मायदेशातून पळ काढावा लागतो त्या कारणांचे सबीज निराकरण झाल्याखेरीज निर्वासितांना आपल्या देशाची वाट धरणे शक्यच बनत नाही. सीरियातील पेचप्रसंगामुळे गेल्या वर्षीपासून युरोपात येत असलेल्या स्थलांतरितांच्या लाटा, हे या वास्तवाचे रोकडे उदाहरण. सीरियातील पेच केव्हा संपुष्टात येईल, हे आजतरी कोणीच सांगू शकत नाही.

मग, निर्वासितांच्या पुढ्यात पर्याय उरतात ते दोनच. ज्या देशात आश्रय घेतला त्या देशातील समाज व श्रमांच्या बाजारपेठेत सात्म पावावयाचे हा झाला दुसरा पर्याय. या मार्गाचा अवलंब केल्याने उद्‌भवणारे प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे ठरतात. भाषा, संस्कृती, पेहराव, परंपरा इथपासून सगळ्यांच बाबी भिन्न असलेल्या दुस-या देशाच्या समाजात बिनबोभाट सामील होऊ न जाणे, ही बाब अत्यंत अवघड शाबीत होते. त्यांतच, जगभरातील एकंदरच राजकीय वातावरण व देशोदेशींचे राजकारण आज अशा सामिलीकरणास अनुकूल मुळीच नाही. स्थलांतरितांच्या अनाहूत आगमनाने निर्माण होणा-या बहुपेडी समस्यांपायी 'स्थानिक' अथवा 'मूलवासी' विरु द्ध 'उपरे' हे संघर्ष युरोपातील अनेक देशांत सुप्तासुप्त अवस्थेत खदखदताना आपण बघतो आहोत. त्यांतूनच एक उग्र व आक्रमक अशी राष्ट्रवादी भावना उदयाला येऊ न त्या भावनेला खतपाणी घालणा-या राजकीय पक्षांचा उत्कर्ष जागतिक राजकारणाच्या पटलावर होत असल्याची उदाहरणे अलीकडच्या काळात वैश्विक समुदायाने अनुभवलेली आहेत.

निर्वासितांच्या प्रश्नाबाबतचा तिसरा उपाय मग उरतो आणि तो म्हणजे मायदेशातून कारणपरत्वे परागंदा झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन अन्य एखाद्या तिस-याच देशात करणे, हा. बहुतेक वेळा जगातील संपन्न व आर्थिकदृष्ट्या प्रगत, श्रीमंत राष्ट्रांतच असे पुनर्वसन संभवते व केलेही जाते. हा पर्याय अनेक अंगांनी सोयीस्कर व हवाहवासा वाटला तरी या संदर्भातील आजवरचे अनुभव कणमात्रही उत्साहवर्धक नाहीत. किंबहुना, पुढ्यात उमटणारे वास्तव कमालीचे निराशाजनकच आहे. पुनर्वसनाबाबत श्रीमंत राष्ट्रे जे वायदे करतात ते मुळातच कमालीचे संदिग्ध आणि अस्पष्टच असतात. निर्वासितांचे यथायोग्य पुनर्वसन आपल्या भूमीवर करण्याबाबत जगातील श्रीमंत राष्ट्रे तोंड भरभरून आश्वासने देतात परंतु प्रत्यक्षात करत मात्र काहीच नाहीत; अथवा, पुनर्वसनाच्या नावाखाली ती राष्ट्रे जे काही करतात ते अत्यंत तुटपुंजे असते, असेच आजवरचे चित्र आहे. या संदर्भात ऑस्ट्रेलियाचे नाव आघाडीवर राहत आलेले आहे. आता, निर्वासितांच्या पुनर्वसनासंदर्भात, युरोपीय समुदायातील देशही ऑस्ट्रेलियाचाच कित्ता गिरवतील अशी साधार भीती जागतिक समुदायाला वाटते आहे.



निर्वासितांचे पुनर्वसन करण्याबाबतची आश्वासने कागदावरच राहिल्याने श्रीमंत देशांत पुनर्वसन घडवून आणलेल्या निर्वासितांच्या पदरी एक तर उदंड हेळसांड तरी येते अथवा त्यांना पुन्हा त्यांच्या मायदेशी पिटाळले तरी जाते. असे असले तरी, पुनर्वसनाबाबत निर्वासितांची स्वाभाविक पसंती असते ती जगातील श्रीमंत राष्ट्रांनाच. कारण, अन्य ठिकाणांच्या तुलनेत निर्वासितांना संपन्न राष्ट्रांमध्ये मिळणारी वागणूक चांगली असते. त्यांना बहाल केला जाणारा दर्जाही उच्च असतो. गुणवत्ता चांगली असणा-या निवा-याची सोय तिथे केली जाते. स्थलांतरित निर्वासितांना देशांतर्गत संचारस्वातंत्र्यही श्रीमंत देश प्रदान करतात. युरोपीय समुदायातील जवळपास सगळ्यांच देशांत स्थलांतरित निर्वासितांना हाच अनुभव येत आलेला आहे. निर्वासितांच्या पुनर्वसनादरम्यान त्यांना पुरविण्यात येणा-या पायाभूत सेवासुविधांची गुणवत्ताही युरोपीय समुदायातील देशांमध्ये अतिशय चांगली असते. इतकेच नाही तर, स्थलांतरणाला पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर अशा निर्वासितांना देशाचे 'कायमस्वरू पी निवासी नागरिक' असा दर्जाही युरोपीय समुदायातील देश मिळवून देतात. परंतु, सीरियातील उद्रेकानंतर उसळलेल्या स्थलांतरित निर्वासितांच्या लोंढ्यांपायी युरोपीय समुदायातील देशांचा पवित्रा आता खूपच बदललेला दिसतो आहे. मुळात, आश्रयाच्या शोधात येणा-या निर्वासितांना आपल्या देशाच्या सीमांपर्यंत येऊ न पोहोचणेच कमालीचे दुष्कर बनवणारे कायदेकानू राबविण्याची मानसिकता युरोपीय समुदायातील देश आता व्यक्त करत आहेत. त्यांमुळे, सक्तीचे स्थलांतर नशिबी आलेल्या निर्वासितांपैकी धाडसी, वाटेल त्या संकटावर मात करण्याची ताकद व मनोधैर्य असणारे निर्वासितच काय ते श्रीमंत देशांमध्ये शिरकाव करू न घेण्यात यशस्वी ठरत आल्याचे आता ध्यानात येते आहे.

अशा परिस्थितीत, निर्वासित स्थलांतरितांपुढे पर्याय उरतो तो आश्रयासाठी विकसनशील देशांचे दरवाजे ठोठवण्याचा. तिथे प्रवेश तुलनेने सोपा असला तरी विकसनशील देशांकडे मुळात पैसाच नसल्याने पुनर्वसनाचा दर्जा कणसरच असतो.

अशा कैचीत सापडलेले जगभरातील निर्वासित आजघडीला याच वास्तवाचा सामना करत आहेत. ■■

# 'चॅनेल्स'... सर्वसमावेशक विकासाची

आर्थिक विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक नसेल तर अर्थव्यवस्थेमध्ये विकासाची बेटे तयार होतात. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत न झिरपलेल्या अशा असमान विकासापायी मग अर्थकारणातच केवळ नव्हे तर समाजकारणात तसेच राजकारणातही अनंत प्रकारचे विरोधाभास निर्माण होऊन समाजाच्या अनेक स्तरांवर उपेक्षितपणाची, अन्यायाची भावना मूळ धरू लागते. त्यांतूनच अलगतेच्या प्रेरणेला खतपाणी घातले जाते. विकासाची प्रक्रिया समाजाच्या जवळपास सर्वच क्षेत्रांत झिरपण्यासाठी किमान दोन गोष्टी आवश्यक ठरतात. एक म्हणजे, आर्थिक वाढीचा दर चांगल्यापैकी सशक्त असणे गरजेचे असते. आणि त्याच वेळी, चांगल्या सशक्त दराने घडून येणारी आर्थिक वाढ सातत्यशीलही असावी लागते. परंतु, देशाच्या ठोकळ उत्पादनातील वाढीचा वार्षिक सरासरी दर बाळसेदार असून भागत नाही. दमदार गतीने आकार घेणारी विकासाची प्रक्रिया सर्वदूर झिरपावी यासाठी अर्थव्यवस्थेतील 'चॅनेल्स'ही चांगल्यापैकी कार्यक्षम असणे गरजेचे ठरते. उदारीकरणानंतरच्या आजवरच्या पाव शतकी वाटचालीदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी वाढलेला असला तरी, असा सशक्त गतीने घडून येणारा विकास अर्थव्यवस्थेत चौफेर झिरपण्यासाठी आवश्यक असणारी 'चॅनेल्स' तितकीच सक्षम बनवण्याबाबत मात्र आपल्याला फारसे यश लाभल्याचे अजूनही दिसत नाही. विकासाच्या संधींचा विस्तार सघनपणे घडून येण्यापासून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रे आजही वंचित असल्याचे आपण पाहतो. शेती आणि एकंदरीनेच शेतीपूरक व्यवसाय, असंघटित क्षेत्रात कार्यरत असलेले वस्तुनिर्माण उद्योग आणि सेवाउद्योग, देशाच्या कानाकोपऱ्यांत सक्रिय असलेले लघुतम, लघु आणि मध्यम आकारमानाचे उद्योगव्यवसाय... यांसारख्या क्षेत्रांमध्ये विकासाच्या संधींचा फैलाव होण्यानेच आर्थिक प्रगतीची प्रक्रिया सर्वसमावेशक बनेल.



आता, हे साध्य करायचे तर त्यांसाठी आवश्यक असणारी 'चॅनेल्स' बळकट बनवण्याखेरीज गत्यंतर नाही. त्या दृष्टीने संबंधित क्षेत्रांत सुधारणा घडवून आणणे आणि अशा सुधारणांसाठी आवश्यक असणारे पुरेशा गुंतवणुकीचे पाठबळ उभे करणे अनिवार्य ठरते. अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांचे जाळे चांगल्यापैकी विस्तृत, सक्षम आणि तंदुरुस्त बनवणे, ही सर्वांत महत्त्वाची बाब या संदर्भात गणावी लागेल. मुख्य म्हणजे, देशातील खेड्यापाड्यांना परस्परांशी आणि यथावकाश राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय महामार्गांशी जोडणारे रस्त्यांचे जाळे विकसित करणे व त्याच्याच जोडीने दळणवळणाच्या सुविधा कार्यक्षम बनवणे अगत्याचे ठरते. रस्तेविकासाच्या बरोबरीनेच बंदरांचा विकास घडवून आणणे आणि अशा विकसित बंदरांना जोडणारी रस्त्यांची साखळी निर्माण करणेही उपकारक ठरेल.

शेतीचा विचार करता, चांगल्या दर्जाची बी-बियाणे शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्ध करून देणे आणि त्याच्याच जोडीने खतांची वितरण व्यवस्था सक्षम बनवणे आजघडीला निकडीचे आहे. परंतु, केवळ एवढ्यानेच भागणारे नाही. कारण, सुधारित बी-बियाणे अथवा/आणि खते यांचा अंगीकार शेतकऱ्यांनी करायला हवा असेल तर सिंचनाची हमीही देणे आवश्यक बनते. त्यांमुळे, सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे व निर्माण झालेली सिंचनक्षमता पुरेपूर वापरात येण्याच्या दृष्टीने कालव्यांचे जाळे निर्माण करणे, याला प्राधान्य मिळायला हवे. केवळ धरणे बांधून भागणारे नसते. धरणप्रकल्प पूर्ण होऊन जलाशय निर्माण झाल्यानंतर त्यांत साठवलेले पाणी शेतकऱ्यांच्या पिकांपर्यंत पोहोचविणारी यंत्रणाच वेळेवर निर्माण केली गेली नाही तर मोठा खर्च करून निर्मिलेली सिंचनक्षमता व्यवहारात वापरलीच जात नाही. शेतीला आणि एकंदरीनेच ग्रामीण भागाला हमीचा आणि स्थिर दाबाचा वीजपुरवठा नियमित व विनाव्यत्यय होत राहावा यांसाठी वीजनिर्मिती आणि निर्माण झालेल्या विजेचे वहन यांसाठी पुरेशा निधीची तरतूद केली जाणे अनिवार्य ठरते. उद्योगांच्या वाढविस्तारासाठी पुरेसा कच्चा माल तयार केला गेला नाही तर बिगर शेती क्षेत्रांत रोजगार संधींची वाढ होण्याच्या शक्यताच खुरट्या राहतात.

आर्थिक विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी अशी ‘चॅनेल्स’ एकीकडे सक्षम बनवत असतानाच अर्थकारणविषयक ज्या ज्या प्रशासकीय अथवा कायदेकानूसंबंधित बाबी भेदकारक, विषमताजनक शाबीत होतात त्यांचे निराकरण करणेही अगत्याचेच असते. ग्रामीण भागांत केले जाणारे वीजनियमन हे अशा विषमतेचे एक दृश्य व रोजच्या परिचयाचे उदाहरण. शेतमालावर, खास करून अन्नधान्ये, फळफळावळ, भाजीपाला यांच्या निर्यातीवर जारी केली जाणारी बंधने, हे दुसरे उदाहरण सांगता येईल. शेतमालाच्या देशांतर्गत उपलब्धतेनुसार निर्यातीबाबतच्या धोरणांमध्ये आवश्यक ते बदल जारी करण्याचे धोरण व्यवहाराच्या दृष्टीने योग्य ठरत असले तरी, निर्यातविषयक धोरणामधील अशा धरसोडीचा शेतमाल उत्पादकांवर अनिष्टच परिणाम होत असतो, हे वास्तव आपण नजरेआड करता कामा नये. शेतीसुधारक उपाययोजनांद्वारे शेतीच्या उत्पादकतेमध्ये सरासरीने वाढ घडून येईल तेव्हा वाढीव उत्पादन बाजारपेठेपर्यंत वाहून नेणारी यंत्रणा सक्षम नसेल तर सरासरीने वाढलेल्या उत्पादकतेचे वाढीव उत्पन्नाच्या रूपातील लाभ शेतक-यांच्या पदरात पडणारच नाहीत. त्यांमुळे, शेतमालाचे उत्पादन, विक्री व निर्यात यांचे भौगोलिक स्थानांकन नीट अभ्यासून त्याला अनुरूप अशी गोदामांची साखळी निर्माण केली जाणे केवळ उपकारकच नव्हे तर आवश्यक ठरते. तसेच, फुले, फळफळावळ, भाजीपाला, दूधदुभते यांसारख्या नाशवंत जिनसांच्या वाहतुकीसाठी शीतकरण सुविधा असलेली वाहने व असा माल साठवण्यासाठी पुरेशा संख्येने शीतगृहेही बांधली जायला हवीत. हे झाले पायाभूत सेवासुविधांच्या निर्मिती व उपलब्धतेसंदर्भात.

आर्थिक विकासाची प्रक्रिया वास्तवात कितपत सर्वसमावेशक ठरेल हे आणखी एका अत्यंत कळीच्या बाबीवर निर्भर राहते... आणि ती बाब म्हणजे विकासाच्या माध्यमातून साध्य होणारी रोजगारनिर्मिती ! सशक्त दराने घडून येणा-या आर्थिक वाढीद्वारे अर्थव्यवस्थेत चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार संघटित क्षेत्रामध्ये विपुल प्रमाणात निर्माण होण्यावर आर्थिक वाढविकासाची ती प्रक्रिया सर्वसमावेशक ठरण्याची शक्यता व क्षमता अवलंबून राहते.



...आणि आर्थिक वाढच्या नेमक्या याच पैलूबाबतचे आपल्या देशातील आजवरचे चित्र फारसे समाधानकारक नाही. विशेषतः, २००० सालानंतरचे या संदर्भातील वास्तव अधिकतर चिंतनीय आणि सचिंत बनवणारे असेच दिसते. आपल्या देशातील श्रमदलात २००० सालानंतर दरवर्षी सरासरी २.२ टक्के ते २.३ टक्के दराने वाढ होत राहिलेली आहे. तर, दुसरीकडे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत रोजगारातील वाढीचा वार्षिक सरासरी दर मात्र जेमतेम १.४ टक्के ते १.८ टक्के इतक्या क्षीण पातळीवर घुटमळत राहिल्याचे संबधित आकडेवारीवरून सिद्ध होते. या ठिकाणी एक कळीचा मुद्दा पुढ्यात येतो. आपल्या देशाच्या ठोकळ उत्पादनामध्ये घडून येणारी वाढ आणि देशांतर्गत रोजगारामध्ये त्यांद्वारे साध्य होणारी वाढ या दोहोंतील सांधा विलक्षण दुर्बळ आहे. अर्थशास्त्रीय तांत्रिक परिभाषेत याला ‘उत्पादनवाढीची रोजगार लवचीकता’ (एम्प्लॉयमेन्ट इलास्टिसिटी ऑफ आउटपुट ग्रोथ) असे म्हटले जाते. देशाच्या ठोकळ उत्पादनातील वाढ आणि रोजगार वाढ यांच्यातील सहसंबंध कितपत दृढ आहे याचे मोजमाप करणारी ही संकल्पना. समजा, देशाचे ठोकळ उत्पादन एक टक्क्याने वाढले तर देशातील रोजगार किती टक्क्यांनी वाढतो, याचे गणन म्हणजे उत्पादनवाढीची रोजगार लवचीकता. १९९०च्या दशकात उत्पादनवाढीची ही रोजगार लवचीकता आपल्या देशात होती अवघी ०.३५ टक्के ते ०.४० टक्के इतकी. २००० सालानंतरच्या दशकात तर हे चित्र अधिकच खालावलेले दिसते. कारण, २००० ते २०१० या दशकभरादरम्यान, उत्पादनवाढीची ही रोजगार लवचीकता घसरून ०.२० टक्क्यांवर आल्याचे आकडेवारी दर्शवते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ठोकळ उत्पादनवाढीची रोजगार लवचीकता इतकी क्षीण असल्यामुळे, दरवर्षी श्रमदलात होणारी वाढ सामावून घ्यावयाची तर आर्थिक वाढीचा वार्षिक सरासरी दर आजच्या तुलनेत किती अधिक सशक्त असणे अनिवार्य ठरते, याची निदान ढोबळ कल्पना तरी यांवरून आपल्याला यावी.

श्रमसघन, श्रमप्रधान अशा वस्तुनिर्माण उद्योगाचा पाया विस्तारण्यात आपल्याला आजवर आलेले अपयश अथवा, वस्तुनिर्माण उद्योगाचा वाढविस्तार घडवण्याकडे आजवर होत आलेले दुर्लक्षच या दुरवस्थेच्या मुळाशी आहे.■■

**शेती**

# प्रतीक्षा राबणा-या हातांची...

आपल्या देशातील शेतीमध्ये गुंतलेल्या मनुष्यबळाच्या जडणघडणीत अलीकडील काही वर्षांत लक्षणीय बदल घडून येत आहेत. विशेषतः, १९९१ सालानंतरचे बदल अधिककरू न गुणात्मक स्वरू पाचे दिसतात. मुळात, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेदरम्यान कोणत्याही अर्थव्यवस्थेतील रोजगाराच्या संरचनेत बदल हे घडून येत राहतातच. भारतीय अर्थव्यवस्थाही त्याला अपवाद नाही. शेतीक्षेत्रामधील अतिरिक्त मनुष्यबळ बिगर शेती उद्योगधंद्यांमध्ये शोषून घेतले जाण्याने शेतीमध्ये कार्यरत असलेल्या मनुष्यशक्तीची सरासरी उत्पादकता वाढण्यास हातभारच लागतो. कारण, अतिरिक्त मनुष्यबळ वस्तुनिर्माण अगर सेवाउद्योगांमध्ये सामावून घेतले जाण्याने शेतीक्षेत्रातील मनुष्य व जमीन यांचे गुणोत्तर सुधारते. राबणा-या हातांना पुरेसे (म्हणजेच, आर्थिकदृष्ट्या सक्षम व किफायतशीर एवढे) क्षेत्र उपलब्ध होते व त्यांद्वारे शेतीवरती उपजीविका भागवणा-या मनुष्यबळाची सरासरी उत्पादकता वाढते. त्यांच वेळी, शेतीमधील मनुष्यबळाची उत्पादकता वाढल्याने शेती कसणा-या कुटुंबांची उत्पन्नाची सरासरी पातळी वाढते व त्यांतून शेतीमध्ये गुंतवणूक शक्य बनते. सुधारित अवजारे, प्रगत तंत्रज्ञान, अत्याधुनिक उपकरणे, जमीनसुधारणा यांसारख्या बाबींमध्ये गुंतवणूक होत राहिल्याने शेतकरी कुटुंबांना सरासरीने उपलब्ध असणा-या लागणक्षेत्राची उत्पादकताही वाढती राहते. उभरत्या अर्थव्यवस्थांचा आजवरचा अनुभव असाच राहिलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगाराच्या आकृतिबंधातही अशाच प्रकारचे बदल घडून येत असले तरी त्या बदलांची गती, 'उभरत्या अर्थव्यवस्था' (इमर्जिंग इकॉनॉमीज्) म्हणून आज जगाच्या आर्थिक नकाशावर मिरवणा-या देशांमधील रोजगाराच्या रचनेत त्या त्या देशांनी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर घडून आलेल्या बदलांच्या तुलनेत सरासरीने कमी भरते. परंतु, हे एवढ्यावरच थांबत नाही. देशातील शेतीमध्ये गुंतलेल्या मनुष्यबळाच्या जडणघडणीत अभ्यासकांना गोंधळात टाकणारे असेच आहेत.



आपल्या देशात २००१ आणि २०११ या अलीकडील दोन दशवार्षिक जनगणना अहवालांच्या माध्यमातून हाती येणारी आकडेवारी या संदर्भात अभ्यसनीय ठरते. २००१ सालातील जनगणनेनुसार, मुख्य श्रमिकांची आपल्या देशात संख्या होती ३१ कोटी ३० लाख ४ हजार ९८३ इतकी. त्यांत, शेतकरी होते १० कोटी ३६ लाख २६ हजार ०६८ इतके. २०११ सालातील आकडेवारी बघता, आपल्या देशातील मुख्य श्रमिकांची संख्या ३६ कोटी २४ लाख ४६ हजार ३११ इतकी असल्याचे दिसते. त्यांत, ९ कोटी ५८ लाख ४१ हजार ३५७ इतके शेतकरी होते. याचाच अर्थ असा की, २००१ ते २०११ या दहा वर्षांच्या कालावधीदरम्यान देशातील शेतक-यांच्या संख्येत ७७ लाख ८४ हजार ७११ इतकी घट घडून आली. तर, सीमान्त श्रमिकांमध्ये समाविष्ट असणा-या शेतक-यांच्या संख्येत याच काळात ८ लाख ३५ हजार ५०० इतकी घट दिसून आली. २००१ साली सीमान्त श्रमिकांमध्ये शेतकरी होते २ कोटी ३६ लाख ८६ हजार ७८३ इतके. सीमान्त श्रमिकांमधील शेतक-यांची हीच संख्या २०११ सालच्या जनगणनेनुसार होती २ कोटी २८ लाख ५१ हजार २८३ इतकी.

आता आपण वळू शेतमजुरांच्या संदर्भातील आकडेवारीकडे. २००१ सालातील जनगणनेनुसार, मुख्य श्रमिकांमध्ये ६ कोटी ३४ लाख ९७ हजार ११४ इतके शेतमजूर होते. तर, २०११ सालातील जनगणनेनुसार, मुख्य श्रमिकांमधील शेतमजुरांची संख्या पोहोचलेली होती ती ८ कोटी ६१ लाख ६६ हजार ८७१ वर. म्हणजेच, मुख्य श्रमिकांमधील शेतमजुरांच्या संख्येत २००१ ते २०११ या दशकभरादरम्यान २ कोटी २६ लाख ६९ हजार ७५७ इतकी वाढ झालेली होती. सीमान्त श्रमिकांमध्ये गणना होणा-या शेतमजुरांची आपल्या देशातील संख्या २००१ सालातील जनगणनेनुसार होती ४ कोटी ३२ लाख ७८ हजार २१६ इतकी. हीच संख्या, २०११ सालातील जनगणनेनुसार वाढलेली दिसते ती ५ कोटी ८१ लाख ६२ हजार ९६२ वर. टक्केवारीच्या भाषेत बोलायचे झाले तर असे दिसते की, २००१ ते २०११ या दहा वर्षांत आपल्या देशातील शेतक-यांच्या एकंदर संख्येमध्ये (म्हणजेच, मुख्य श्रमिकांतील तसेच सीमान्त श्रमिकांमधील शेतकरी धरू न) ६.७७ टक्क्यांची घट झाली.

या सगळ्या चित्रातील मुख्य लक्षणीय भाग दिसतो तो इथेच. २००१ ते २०११ या दशकभरात देशातील मुख्य श्रमिकांच्या वर्गामध्ये अंतर्भाव होणा-या शेतक-यांच्या संख्येत जवळपास साडेसात टक्क्यांची घट झाली. तर, सीमान्त श्रमिकांच्या गटात समाविष्ट असणा-या शेतक-यांच्या संख्येत जवळजवळ साडेतीन टक्क्यांची घट घडून आली. दुसरीकडे, आपल्या देशातील एकंदर शेतमजुरांच्या संख्येत (मुख्य श्रमिकांमधील शेतमजूर अधिक सीमान्त श्रमिकांमधील शेतमजूर) २००१ ते २०११ या दहा वर्षांच्या काळात ३५.१७ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. त्यांतही अधिक महत्त्वाची बाब म्हणजे, मुख्य श्रमिकांच्या गटातील शेतमजुरांची संख्या त्या दशकभरात ३५.७० टक्क्यांनी तर; सीमान्त श्रमिकांच्या गटातील शेतमजुरांची संख्या ३४.३९ टक्क्यांनी वाढली. याचा एक अर्थ असा होतो की, आपल्या देशातील शेतक-यांच्या गटातील अनेक आता शेतमजुरांच्या गटात ढकलले जात आहेत. किंवा, असेही म्हणता येईल की, अनेकविध कारणांपायी शेती कसणे किफायतशीर होत नसल्याने आपल्या देशातील अल्प तसेच अत्यल्प भूधारक शेतकरी पदरची शेती करण्याचे थांबवून उपजीविकेसाठी आता शेतमजुरीकडे वळत आहेत.

जगण्यासाठी शेतीवरती अवलंबून असणा-या मनुष्यबळाच्या जडणघडणीत आपल्या देशात अलीकडील दोन दशकांदरम्यान जे गुणात्मक बदल घडून येताना दिसतात त्यांचा संबंध १९९१ सालानंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सक्रिय बनवण्यात आलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाशी जोडला जाणे अतिशय स्वाभाविक ठरते. परंतु, भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगारीच्या पैलूबाबत या पूर्वी करण्यात आलेल्या संशोधनांद्वारे हाती येणारा तपशील डोळ्यांत अंजन घालणारा आहे. केंद्रिय नियोजन आयोगाचे तत्कालीन उपाध्यक्ष आणि आपल्या देशातील एक ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. मॉन्तेकसिंह अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखाली एका कृतिदलाची स्थापना केंद्र सरकारने १९९९ सालातील जानेवारी महिन्यात केली होती. आपल्या देशातील रोजगारसंधींबाबत अभ्यास करून त्यांबाबत अहवाल सादर करण्याची जबाबदारी त्या कृतिदलावर सोपवण्यात आलेली होती. कृतिदलाने आपला अहवाल २००१ सालातील जुलै महिन्यात सादर केला.



आपल्या देशाच्या ग्रामीण भागातील रोजगाराच्या जडणघडणीत गेली सुमारे तीन दशके साकारत असलेल्या बदलांसंदर्भातील या अहवालात सादर करण्यात आलेली आकडेवारी विलक्षण मननीय आहे. १९७०च्या दशकापासून, स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपल्या देशाच्या ग्रामीण भागात रोजीरोटी कमावणा-यांच्या प्रमाणात सतत घट होत आलेली दिसते. उपजीविकेचा हा पर्याय अवलंबणा-या ग्रामीण श्रमिकांचे एकूणांतील प्रमाण १९७७-७८ ते १९८७-८८ या दशकभरादरम्यान ६३ टक्क्यांवरून ५९ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे संबंधित सांख्यिकीवरून स्पष्ट होते. उदारीकरणाचे पर्व भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अवतरल्यानंतर, म्हणजे, १९९३-९४ ते १९९९-२००० या दरम्यान हेच प्रमाण ५८ टक्क्यांवरून घसरून ५६ टक्क्यांवर आले. परंतु, या ठिकाणी आवर्जून ध्यानात घेण्याजोगी दुसरी बाब म्हणजे, ग्रामीण भागातील हंगामी स्वरूपाच्या रोजगाराच्या प्रमाणात १९७०च्या दशकापासून पुढे सतत वाढ होताना दिसते. हंगामी स्वरूपाच्या रोजगाराद्वारे उपजीविका करणा-यांचे देशाच्या ग्रामीण भागांतील एकूण श्रमिकांमध्ये १९७७-७८ या वर्षात प्रमाण होते २९.७ टक्के इतके. हेच प्रमाण १९९९-२००० या वर्षापर्यंत ३७.३ टक्क्यांपर्यंत वाढले.

या सगळ्या आकडेवारीमध्ये एक सहसंबंध नांदताना संभवतो. तो असा की, अनेक प्रकारच्या कारणांपायी शेती कसणे अवघड झाल्यामुळे आणि/अथवा शेती करणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नसल्यामुळे कोरडवाहू क्षेत्रातील लहान शेतकरी, अल्प वा अत्यल्प भूधारक पदरची शेती करण्याचे थांबवून रोजंदारीवर काम करण्याच्या पर्यायाकडे वळत असले पाहिजेत. देशाच्या ग्रामीण भागातील रोजगाराच्या जडणघडणीमध्ये घडून येत असलेले गुणात्मक बदल हे केवळ उदारीकरणाशी संबंधित नाहीत, तर; ही प्रक्रिया किती तरी आधीपासूनच सुरू झालेली आहे, हे वास्तव स्पष्ट करण्यासाठीच ही आकडेवारी इथे सादर केलेली आहे. २००१ सालानंतर तीच प्रक्रिया अधिक सघन व तीव्र बनली असावी. २००१ आणि २०११ या दोन सालांतील जनगणनांद्वारे उपलब्ध होणा-या आकडेवारीचे अगदी प्राथमिक विश्लेषण केले तरी हाती येणारे निष्कर्ष याच अनुमानाला बळकटी देतात.

## एक खुपणारा विरोधाभास

आपल्या देशातील लहान शेतकरी, अल्प व अत्यल्प भूधारक शेती कसण्याचे थांबवून ग्रामीण भागातील शेतीतील तसेच बिगर शेती उद्योगव्यवसायांतील रोजंदारीकडे वळत असावेत हा अदमास २००१ तसेच २०११ सालातील जनगणना अहवालांद्वारे हाती येणारी सांख्यिकीही ढोबळ मानाने अधोरेखित करते. २००१ सालच्या जनगणना आकडेवारीनुसार, देशातील एकंदर श्रमिकांमध्ये शेतक-यांचे प्रमाण होते ३१.६५ टक्के इतके. तेच प्रमाण २४.६४ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे २०११ सालातील जनगणना आकडेवारी आपल्याला सांगते. याच्या बरोबर उलटे चित्र आपल्याला दिसते ते शेतमजुरांच्याबाबतीत. देशातील एकंदर श्रमिकांमध्ये शेतमजुरांचे प्रमाण २००१ साली होते २६.५५ टक्के इतके. तेच प्रमाण, २०११ सालच्या जनगणना आकडेवारीनुसार २९.९६ टक्क्यांपर्यंत वाढलेले दिसते. म्हणजेच, २००१ ते २०११ या दशकभरादरम्यान देशातील शेतक-यांच्या प्रमाणात जवळपास सात पर्सेन्टेज पॉइंट्स्नी घट घडून आली, तर; देशातील शेतमजुरांच्या प्रमाणात त्याच कालावधीदरम्यान जवळपास साडेतीन पर्सेन्टेज पॉइंट्स्नी वाढ झाली.

एकीकडे आपल्या देशातील शेतमजुरांच्या प्रमाणात वाढ घडून येते आहे तर, दुसरीकडे ग्रामीण भागातील रोजगाराचे लक्षणीय प्रमाणावर हंगामीकरण सतत चालू आहे. या सगळ्यांमुळे आपल्या देशातील शेतीउद्योगात आता श्रमिकांची रेलचेल असेल, असे अनुमान कोणीही स्वाभाविकपणे काढेल. आणि, नेमक्या याच ठिकाणी सगळ्यांची फसगत होण्याची शक्यता अतिशय मोठी आहे. शेतीव्यवसायातील रोजंदारीच्या संदर्भात एक विलक्षण बोचणारा विरोधाभास देशात नांदतो आहे तो नेमका इथेच. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने अलीकडील काळात केलेल्या नमुना पाहण्यांद्वारे हाती येत असलेली सांख्यिकी त्या विरोधाभासाचे पदर-अंतःपदर उलगडून पुढ्यात मांडते. स्वयंरोजगाराचा पर्याय अवलंबणा-यांचे प्रमाण ग्रामीण भागात घटून तेथील श्रमिक रोजंदारीचा आश्रय वाढीव प्रमाणावर घेत असले तरी, शेतीमध्ये राबण्यास मात्र लोक घाऊक प्रमाणावर उत्सुक नाहीत, हे वास्तव संबंधित आकडेवारी आपल्या पुढ्यात मांडते.



राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने अलीकडील काळात वेळोवेळी केलेल्या पाहण्यांनुसार, २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात शेतीमधून जवळपास ३ कोटी ४० लाख श्रमिक बाहेर पडले. अन्नधान्योत्पादनाच्या दृष्टीने आपल्या देशात आघाडीवर असणा-या उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांतील शेतीला या प्रवृत्तीचा चटका तुलनेने अधिक बसला व आजही बसतो आहे. गहू व तांदळासारखी तृणधान्य पिके आणि ऊस, भुईमूग व कापूस यांसारखी तीन मुख्य नगदी पिके घेणारे शेतकरी यांत सर्वाधिक भरडून निघाले. या वाढत्या कलाचा एक स्वाभाविक प्रभाव म्हणजे, शेतीवर राबणा-या श्रमिकांच्या सरासरी मेहेनतान्यात आताशा लक्षणीय वाढ होते आहे. नांगरणी, पेरणी, पुनर्लावणी ही शेतीमधील त्यांतल्या त्यांत अधिक श्रमसघन कामे. अशी कामे करणा-या श्रमिकांच्या सरासरी मजुरीमध्ये २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात जवळपास साडेतीन पट ते चौपट वाढ घडून आलेली दिसते. परिणामी, तांदळासारख्या तृणधान्याच्या एक एकक उत्पादन खर्चामध्ये, श्रमिकांच्या मजुरीवर केल्या जाणा-या खर्चाचे प्रमाण जवळपास ५० टक्क्यांपर्यंत वाढलेले आहे. श्रमिकांच्या मजुरीत वाढ घडून येण्याने गहू व तांदळासारख्या पिकांच्या उत्पादन खर्चात अलीकडे दरसाल सरासरी दहा टक्के दराने वाढ होते आहे.

बांधकाम तसेच सेवाउद्योग क्षेत्रांमध्ये नव्याने उपलब्ध होत असलेल्या रोजगार संधी ग्रामीण भागातील होतकरूहातांना अधिक आकर्षक वाटतात, हे शेतीकडे श्रमिकांनी पाठ फिरवण्यास सुरुवात करण्यामागील एक बळकट कारण सांगितले जाते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमुळेही शेतीसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याचा काही अभ्यासक व संशोधकांचा दावा आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामीण भागातील इच्छुक कुटुंबास किमान वेतनदराने वर्षभरात १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देते. परंतु, प्रत्यक्षात या योजनेद्वारा सरासरीने वर्षभरात ३१ दिवसांपेक्षा अधिक दिवसांचा रोजगार मिळत नसल्याचे अनेक अभ्यास सांगतात. त्यांमुळे, या योजनेपायी शेतीसाठी मजूर मिळत नाहीत, हा दावा अयथार्थ असल्याचे अनेकानेक अहवालांचे निष्कर्ष सांगतात.

हे जरी खरे असले तरी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील मजुरीच्या सरासरी दरपातळीत लक्षणीय वाढ घडून आलेली आहे, हे वास्तव नाकारता न येण्याजोगे आहे. काही संशोधन संस्थांच्या भविष्यकथनानुसार, येत्या पाचएक वर्षांत आपल्या देशातील शेतीक्षेत्रामधून आणखी दोन ते सव्वा दोन कोटी श्रमिक बाहेर पाय घालतील. हे भाकित खरे ठरले तर अथवा ठरेल तेव्हा, त्याचे भारतीय शेती आणि शेतकरी या दोहोंवर सकारात्मक आणि नकारात्मक असे उभय परिणाम संभवतात. एक म्हणजे, श्रमिकांच्या तुटवड्यापायी मजुरीचे सरासरी दर वाढते राहून कृषिजन्य जिनसांचा उत्पादन खर्च वाढत जाईल. त्या मानाने शेतमालाचे बाजारभाव समांतर वाढले नाहीत तर शेतीचा व्यवसायच अ-किफायतशीर ठरत जाईल. अनेक अभ्यासकांच्या मते आजही घडते आहे ते नेमके हेच. तेच घडत राहिले तर, लहान शेतकरी आणि अल्प व अत्यल्प भूधारक शेती कसण्याचे थांबवत असल्याचा जो कल या आधी दिसलेला आहे तो भविष्यातही तसाच कायम राहील. परंतु, याच वास्तवाची सकारात्मक बाजू म्हणजे, राबणा-या हातांचा तुटवडा शेतीक्षेत्राला जाणवत राहिल्याने मनुष्यबळाची जागा येत्या काळात यंत्रशक्ती घेऊ लागेल व त्यांतून शेती कसण्याच्या कार्यपद्धतीचे यांत्रिकीकरण वेग धरेल. यांतून, शेती आणि यंत्रसामग्री निर्माण करणारे वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्र यांच्यातील नात्याची पुनर्मांडणी सुरू होईल. त्यांमुळे, उद्योगक्षेत्राला चालना मिळत राहील.

शेतीकडून ग्रामीण भागातील तसेच देशातील मोठ्या शहरामधील बिगर शेती व्यवसायांकडे वळण्यास श्रमिकांना प्रवृत्त करण्यास अनेकानेक घटक कारणभूत ठरत आहेत. एक तर, अगदी खेडोपाडीही उच्च शिक्षणाच्या संधी खुल्या होत असल्याने शिक्षणाचे प्रमाण चांगल्यापैकी उंचावलेले आहे. त्यांतून ग्रामीण नागरिकांच्या अपेक्षा उंचावत आहेत. शहरी जीवनपद्धतीचे आकर्षणही एकीकडे विस्तारते आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यासारख्या कल्याणकारी योजनांमुळेही शेतीमध्ये राबण्याची एकेकाळची सक्ती आता खूपच सैल होते आहे. हे सगळे बघता, शेतीसाठी मनुष्यबळाची कमतरता या पुढे सततच जाणवत राहील, याची खूणगाठ शेतकरी बांधत आहेत.



किंबहुना, शेतक-यांनीच केवळ नव्हे तर, जवळपास सगळ्यांच संबंधित घटकांनी मनुष्यबळाच्या भविष्यकालीन संभाव्य तुटवड्याचा मुकाबला करण्यासाठी सिद्ध बनण्यास सुरुवात केलेली आहे. शेती करण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ किमान पातळीवर आणण्यासाठी जरूरीची असणारी यंत्रतंत्रे खरेदी करून त्यांचा वापर करण्यास शेतक-यांनी वैयक्तिक पातळीवर प्रारंभ केलेलाच आहे. त्याच्याच जोडीने, ट्रॅक्टर, फवारणी यंत्रे, मळणी यंत्रे, उफणणी यंत्रे यांसारखी अवजारे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा जोडधंदाही अनेक राज्यांत नव्याने बहरूलागलेला दिसतो. राबणा-या हातांची संख्या घरोघरीच घटलेली असल्याने समूह तत्त्वावर अथवा प्रसंगी सहकारी तत्त्वावर अनेक छोट्या व मध्यम शेतक-यांनी एकत्र येऊन जमीन कसण्यासारखे प्रयोगही काही राज्यांत चाचपून बघितले जात आहेत. केरळमध्ये तर महिलांचे बचतगट एक अभिनव उपक्रम राबवताना दिसतात. घरी असलेली शेती कसण्यासाठी घरात आता पुरेशी माणसेच नसल्याने लागवडीअभावी पडीक राहिलेल्या जमिनी खंडाने घेऊन त्या लागवडीखाली आणण्यात आता केरळमधील महिला बचतगट पुढाकार घेत आहेत. हिमाचल प्रदेशसारख्या डोंगराळ मुलुखात शेतीचे यांत्रिकीकरण घडवून आणण्यास तिथल्या भूगोलामुळे अतिशय मर्यादा पडतात. त्यांमुळे, श्रमशक्तीवर अवलंबून राहण्याखेरीज तिथल्या शेतमालकांना आणि सफरचंद बागायतदारांना अन्य पर्यायच नाही. अशा परिस्थितीत, थेट जम्मू-काश्मीरपर्यंत हिंडून श्रमिकांना गोळा करण्याचा पर्याय अवलंबण्याची परिस्थिती तिथल्या शेतक-यांवर आलेली आहे. स्थलांतरित मजुरांना वा त्यांच्या गटांना खंडकरी बनवून त्यांच्यामार्फत शेतीचा हंगाम निभावून नेण्यासारखे प्रयोगही तिथे केले जात आहेत. दुसरीकडे, यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी शेतक-यांना अनुदाने देण्याच्या दृष्टीने काही राज्य सरकारे वित्तीय तरतूद करताना दिसतात. शेतीला उपयोगी ठरणारी नवनवीन यंत्रे तयार करण्यासाठी उद्योजकही सरसावत आहेत.

एकंदरीने, येत्या काळात भारतीय शेती आणि तिच्यात गुंतलेले मनुष्यबळ यांचे चित्र आमूलाग्र बदललेले असेल याची चुणूक दाखवणाराच हा सारा घटनाक्रम म्हणायला हवा. ■■

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

'सैरभैरता वैश्विक तरुणाईची...' हा लेख आवर्जून वाचण्याजोगा आहे. या लेखात, विश्वातील तरुणांशी निगडित शिक्षण - प्रशिक्षण, रोजगार आणि या दोहोंचे राष्ट्रांच्या अर्थनीतीवर होणारे परिणाम व या सा-यांचा तरुणांच्या जीवनामध्ये उमटणारा पडसाद प्रतीत होतो. वरील प्रश्नांची उत्पत्ती - सद्यःस्थिती या लेखात सकारण विशद केलेली आहे. आणि म्हणूनच विषयाशी निगडित केलेले विवेचन सार्थ व पटण्याजोगे आहे. शिक्षक/ प्राध्यापक मंडळींनी सदर लेखातील आशय विद्यार्थीवर्गास व पालकांना पुरवल्यास, तरुणांच्या काही समस्या सोडविण्याच्या दिशेने किमान खारीचा वाटा तरी उचलला जाऊ शकतो. लेखासंदर्भात एकच बाब खटकली. संपूर्ण लेखात विविध निरीक्षणांसंदर्भात जी आकडेवारी पुरविलेली आहे ती आपला भारत देश वगळून अन्य देशांची पुरविलेली आहे. लेखगत विषयाला अनुसरून, भारतासंदर्भात अशी सांख्यिकी पुरवली असती तर, आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवलेले आहे याचा अंदाज अभ्यासकांना आला असता. ***प्रा. संजीव मनोहर वाडीकर, सातारा.***

'अर्थबोधपत्रिके'च्या एप्रिल महिन्याच्या अंकातील 'मुकाबला, एका सनातन पेचाशी...' हा लेख वाचला. सरकार आणि रिझर्व्ह बँक अशी दोन शक्तिस्थळे आपल्या व्यवस्थेमध्ये निर्माण झालेली आहेत. जुगारी प्रवृत्तींचा निर्देशक असलेला सेन्सेक्स म्हणजे समृद्धीचा मापदंड आणि ठोकळ देशी उत्पादनामधील सशक्त वाढ म्हणजे आर्थिक प्रगती या दोन समजुतींचे भूत केंद्राच्या मानेवरून उतरेल तो सुदिन. आपल्या देशाला पुन्हा समृद्ध व्हावयाचे असेल तर परकीय भांडवल नव्हे तर उपलब्ध संसाधनांचे काटेकोर नियोजन आवश्यक आहे. स्वतंत्र भारताच्या पुढ्यातील हाच खरा सनातन पेच होय. **विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडाळ.**

'अर्थबोधपत्रिके'चा एप्रिलचा अंक सुनीती सु. र. यांच्या घरी बघण्यास मिळाला. कमीतकमी पानांत आपण जे करत आहात त्यांबद्दल कृतज्ञ असण्याखेरीज काही असू नये असे तीव्रतेने वाटले. **दिलीप लिमये, मसूर.**



*(पृष्ठ क्रमांक ३ वरून)*

युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याच्या ब्रिटनच्या निर्णयामुळे युरोपीय समुदायाच्या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने एकंदरीतच अधिक कडवी बनली तर त्याच्या झळा चीनला बसणे नैसर्गिक ठरते. अमेरिकेमध्ये आता नव्याने सत्तारूढ कोण होते आणि जी कोणी व्यक्ती अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेईल तिची चीनबाबतची भूमिका काय राहील, हा या सगळ्या अस्थैर्यपर्वाचाच आणखी एक कोन. भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य या अशा बहुकोनी अस्थैर्याच्या कोंदणात ठरणार आहे. या सगळ्या गुंतागुंतीपायी, आर्थिक विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक बनवण्याचे आव्हान येत्या काळात अधिकाधिक जटिल बनत जाईल. विकासाचा दर सशक्त बनवत असतानाच तो सर्वसमावेशक बनवायचा तर देशातील रोजगाराचा आकृतिबंध त्यासाठी पूरक बनायला हवा. त्या संदर्भात, आपल्या देशातील शेतीक्षेत्रात रोजीरोटी कमावणा-या श्रमिकांच्या विश्वात घडून येत असलेले बदल अभ्यसनीय ठरतात. अशा काही पैलूंचा वेध घेणारा 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील मजकूर वाचकांना रोचक वाटेल, अशी आशा आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
**यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# ‘अर्थबोधपत्रिके’चा वार्षिक आढावा

गेल्या वर्षभरात, म्हणजे, १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या वर्षभरात ‘अर्थबोधपत्रिके’च्या १४व्या खंडातील जे १२ अंक प्रकाशित झाले त्या अंकांद्वारे कोणकोणते विषय वाचकांसमोर सादर करण्यात आले त्याचा एक संक्षिप्त आढावा इथे सादर केला आहे.

**(१) प्रकाशित साहित्य** - १४व्या खंडातील १२ अंकांमध्ये एकूण ५२ लेख प्रकाशित झाले. यांत दोन लेख पुरवणी लेखांच्या स्वरूपात होते. मुख्य लेखांची संख्या होती ३८. तर, ‘जिकडेतिकडे’ या सदरांतर्गत एकूण १२ स्फुटे प्रकाशित करण्यात आली होती. हे दोन्ही मिळून लेखसंख्या होते ५० इतकी. वर्षभरातील १२ अंकाद्वारे एकंदर ४४४ पानांचा छापील ऐवज वाचकांना सादर करण्यात आला. संस्थांतर्गत काही पुनर्रचनेमुळे सर्वच्या सर्व, म्हणजे, १२ अंकांद्वारे (प्रत्येक अंकात ४० पाने या प्रमाणे) ४८० पाने वाचकांना सादर करता आली नाहीत, याचा खेद होतो व त्यांबद्दल दिलगिरीही व्यक्त करायलाच हवी. चालू वर्षातील १२ अंकांदरम्यान तो अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करण्यात येईल.

**(२) विविध देशांचा फेरफटका** - जागतिकीकरणाच्या आजच्या युगात जगाचे नागरिक बनलेल्या आपल्या सर्वांना जागतिक स्तरावरील विविध घडामोडींची जाणीव असणे हे गरजेचे आहे. त्या नुसार, जगभरात कुठे काय विषय महत्त्वाचे ठरत आहेत ते लक्षात घेऊन भारत, चीन, अमेरिका, दक्षिण अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, मोरोक्को, इटली आणि फिलिपिन्स इत्यादी देशांमधील विविध घटना-घडामोडींवर आधारित विवेचक असे लेख प्रसिद्ध करण्यात आले. वेगवेगळ्या लेखांत कारणपरत्त्वे केवळ उल्लेख आलेल्या देशांचा समावेश या यादीमध्ये करण्यात आलेला नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी. ज्या देशांतील ज्या काही घडामोडींची विश्लेषक व विस्तृत नोंद लेखांमध्ये घेतलेली होती अशा देशांचीच सूची इथे सादर केलेली आहे.



**अर्थबोधपत्रिका खंड १४ (एप्रिल २०१५ - मार्च २०१६)**
**प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण (एकूण लेखसंख्या - ४०)**

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांची शीर्षके |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | ०९ | (१)गोधनाची घटती संख्या... : आता गोमाता केवळ पूजेपुरतीच उरणार का ? (२) परंपरेच्या ‘बखरी’ (३) ‘त्या’ तरुणांची शोधयात्रा (४) ‘भूकंपा’ची कंपने (५) ... याला ‘माणूस’ ऐसे नाव ! (६) चिनी माती (७) शताब्दी, एका अनमोल दस्तऐवजाची (८) दशावतार एका जीवघेण्या कुचंबणेचे... (९) दहशतवाद आणि जागतिक अशांतता (पुरवणी लेख). |
| २ | आर्थिक | ०७ | (१)चर्चा, वस्तू व सेवा करप्रणालची (एकच विषय एकंदर तीन अंकांत तीन लेखांकांच्या स्वरूपात सादर करण्यात आलेला होता. त्यांमुळे लेखांच्या या उपगटात विषय पाच असले तरी लेखसंख्या मात्र सात इतकी भरते ). (२) जागतिक श्रमविश्वात डोकवताना (३) वाटचाल दोन तपांची ... (४) बदलता ग्रामीण भारत : आव्हाने आणि संधी (पुरवणी लेख) (५) वित्तीय तुटीचे नियंत्रण का महत्त्वाचे ? |
| ३ | पुरातत्त्व | ०४ | (१) हरवलेले जग (२) कलेचा शोध....बोध (३) ‘पाऊल’खुणा (४) कपीची पाऊले |
| ४ | पर्यावरण | ०४ | (१) आता जपायची ती भूविविधता...(२) शिकार प्राण्यांची..., ... मृत्यू वनस्पतींचा (३) हवामान बदल आणि बदलते पर्जन्यमान (४)सहावी घंटा |

| प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण (एकूण लेखसंख्या - ४०) | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांची शीर्षके |
| ५ | संशोधन | ०३ | (१) शेवटचे पान (२) गोठलेले संशोधन (३) हिमगर्भात ! |
| ६ | भाषा | ०३ | (१) बोलका बर्फ (२) 'तंत्र'बोली (३) भाषेची पाळेमुळे |
| ७ | कृषी | ०२ | (१) पोषणदायी शेतीपद्धती (२) प्रश्न सांडपाण्यावरील शेतीचा |
| ८ | सांस्कृतिक | ०२ | (१) योग आणि नव - योग (२) शब्द आणि शब्दांच्या अलीकडले... |
| ९ | नागरीकरण | ०१ | (१) आता पर्व (उप)नगरीय वाढीचे... |
| १० | तंत्रज्ञान | ०१ | (१) आता वनस्पतींपासून सामिषसदृश खाद्यपदार्थ. |
| ११ | साहित्य | ०१ | (१) पत्रकारितेचा 'नोबेल' सन्मान |
| १२ | इतिहास | ०१ | (१) निद्रेचे उत्खनन |
| १३ | मेंदूसंशोधन | ०१ | (१) 'दिवस' तुझे हे... |
| १४ | विज्ञान | ०१ | (१) जगावेगळा संशोधक |



**(३) काही विशिष्ट विषय** - संस्थेशी संलग्न असलेल्या अभ्यासकांनी त्यांच्या त्यांच्या अभ्यासविषयांसंदर्भात २०१५ साली आयोजित करण्यात आलेल्या कै. वि. म. दांडकेर स्मृती चर्चासत्रादरम्यान सादरीकरण केले. त्या वेळी झालेल्या विचारमंथनावर बेतलेला काही मजकूर सप्टेंबर २०१५च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला. तसेच, वस्तू व सेवा करप्रणाली हा आपल्या देशातील अर्थविश्वात अलीकडे विशेष चर्चेचा विषय ठरतो आहे. या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन तीन लेखांमधून या विषयाचे नानाविध पैलू मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. कृषी अर्थशास्त्राचे आपल्या देशातील एक ज्येष्ठ अध्यापक व संशोधक आणि संस्थेच्या नियामक मंडळाचे एक सन्मान्य सदस्य डॉ. नीळकंठ रथ यांचा, आपल्या देशातील गोधनाच्या बदलत्या चित्राचे अंतरंग संबंधित आकडेवारीनिशी तपशीलवार विशद करणारा लेख २०१५ सालातील जुलै महिन्याच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला. त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिकशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संबंधित विषयाचे प्राध्यापक डॉ. श्रीकांत परांजपे यांनी 'दहशतवाद आणि जागतिक अशांतता' या विषयावर केलेल्या भाषणाचा विस्तृत सारांश फेब्रुवारी २०१६च्या अंकात पुरवणी लेखाच्या रूपाने सादर करण्यात आला. २०१५ हे वर्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष होते. ते औचित्य ध्यानात घेऊन, बाबासाहेबांच्या प्रकांड व चौफेर विचारविश्वातील काही निवडक व आजही प्रस्तुत असलेले विचार एकंदर ३८पानांमधून मांडण्याचा प्रयत्न वर्षभर करण्यात आला.

**(४) संदर्भ साहित्य:** वर्षभरातील १२ अंकांमध्ये सादर केलेले लेखन निर्माण करण्यासाठी संदर्भस्त्रोत म्हणून वापरलेल्या साहित्याचा तपशील पुढीलप्रमाणे : **(अ) देशी-विदेशी नियतकालिके:** इकॉनॉमिस्ट, न्यू सायंटिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली, जिऑग्रफिकल - एकूण संख्या सहा. **(ब) पुस्तके/अहवाल** - एकूण ०८. **(क) संकेतस्थळे (वेबसाइट्स्)** - एकूण ३४.

या शिवाय, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या समृद्ध ग्रंथालयातील अहवाल, ग्रंथ वेळोवेळी संदर्भासाठी वापरण्यात येतातच. ■■

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines** - (1)Down To Earth, Science and Environment Fornightly, 1-15 December 2015, Volume 24, Number 14. (2) The Economist, May 28th-June 3rd 2016, Volume 419, Number 8991.
**(B) Books/Reports** - (1) Planning Commission Reports on Labour and Employment, Academic Foundation, New Delhi, 2002.

(२) Dilemmas of Growth Dynamics in India and Other Emerging Economies : Policies for Resolution, Unpublished paper written by Prof. Dr. Vikas Chitre, First version - 29 August 2012, Revised on 25 September 2015.


■■


## Poverty in India

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## दुसरी आवृत्ती प्रकाशित

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

## कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** **फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी** **फक्त १८० / - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी** **फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी** **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)
(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)
(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## *ग्रंथालयातील पुस्तके*

**मराठवाड्यातला दुष्काळ भूतकाळ व्हावा म्हणून...**
**एकात्मिक दुष्काळमुक्ती धोरण हवे; ऑब्झर्व्हर रीसर्च फाउंडेशन मुंबई, महाराष्ट्र अध्ययन केंद्र व विकास अध्ययन केंद्र, अध्ययन व लेखन - नीलेश बने, रेणुका कड, स्वरूप पंडित आणि सिद्धार्थ हरळकर, मुंबई, एप्रिल २०१६, पृष्ठे - १८५, मूल्य - नमूद केलेले नाही.**

सलग दोन वर्षे मॉन्सूनच्या पावसाने हुलकावणी दिल्यामुळे महाराष्ट्राचे सगळेच चित्र कळाहीन बनले. त्यांतही तुलनेने अधिक भीषण परिस्थिती होती ती मराठवाड्यात. तसे बघितले तर, मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांचा समावेश असणारा औरंगाबाद विभाग हा संपूर्ण राज्यात सर्वार्थाने विशाल ठरतो. सलग दोन वर्षे पावसाने अवकृपा केल्यामुळे मराठवाड्याला कमालीच्या पाणीटंचाईचा तसेच चाराटंचाईचा सामना करणे भाग पडते आहे. तसे बघितले तर महाराष्ट्राला आणि मराठवाड्यालाही दुष्काळ वा पाणीटंचाई नवीन नाही. परंतु, गेल्या दोन वर्षांतील वाताहतीचे स्वरूप व व्यापकताच इतकी सघन ठरली की या नैसर्गिक आपत्तीबाबत सर्वत्रच चर्चा, विचारविनिमय, संशोधने, अभ्यास यांनी उचल घेतली. अशा विवेचक संशोधनउपक्रमांचाच एक भाग म्हणून मुंबई येथील ऑब्झर्व्हर रीसर्च फाउंडेशनने प्रवर्तित केलेल्या विचारमंथनाचा दृश्य परिपाक म्हणजे प्रस्तुत दस्तऐवज. विस्तृत प्रमाणावर केलेले क्षेत्रीय संशोधन, शासनयंत्रणा, शासकीय अधिकारी तसेच समाजाच्या विविध स्तरांतील नागरिक यांच्याशी थेट संपर्क साधून, चर्चेद्वारे संकलित केलेल्या तपशीलाचे अतिशय आकर्षक स्वरूपात केलेले सादरीकरण, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणायला हवे. दुष्काळापायी उद्भवणा-या दुरवस्थेचे बारीकसारीक पैलू व कंगोरे अक्षरबद्ध करत असतानाच, दुष्काळाच्या पकडीतून मराठवाडा कायमचाच मुक्त व्हावा यासाठी एकात्मिक उपाययोजनेचा ऊहापोह करणारा हा दस्तऐवज सर्वच स्तरांतील वाचकांना संदर्भासाठी उपयुक्त ठरावा. ■■



## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**